लपात, चिखलगी,ता.मंगळवेढा, जि. सोलापूर योजनेस, सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा १०१२/(३२४/२०१२)/ ल.पा.१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ३० मे २०१५

**वाचा**

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे जा.क्र.मकृखेविम/२१२/(९५५/२०१२)/लपा-१/६७७३, दि.१४/०९/२०१२चे पत्र.
२) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे पत्र क्रं. व्ययस- २०१५/प्रक्रं११३/अर्थसं-२, दि.६ मे,२०१५

**प्रस्तावना**

लपात, चिखलगी,ता.मंगळवेढा, जि. सोलापूर या योजनेस दिनांक १३.०३.१९८१ अन्वये रु.१६९.२२ लक्ष इतक्या रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत आली होती. सदर अंदाजपत्रक -१९७९-८० च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले होते.प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूचीच्या दरातील वाढ, भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ, संकल्पचित्रातील बदलांमुळे व इतर कारणांमुळे (निविदा अधिक्य इ.) किंमतीत झालेल्या वाढीमुळे सन२०११-१२ ची दरसुची वापरुन सुधारित अंदाजपत्रक तयार करुन रु.८६३.४५ लक्ष रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे कडून शासनास प्राप्त झाला होता व तो शासनाच्या विचाराधिन होता. सदर प्रस्तावासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

१) सोलापूर जिल्ह्यातील लपात,चिखलगी या योजनेस या योजनेस सन २०११-१२ची दरसूचीवर आधारित केलेल्या सुधारित प्राक्कलनानुसार कामाच्या अंदाजित रु . ८६३.४५ लक्ष (रुपये आठ कोटी त्रोसष्ठ लाख पंचेचाळीस हजार फक्त )या किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी कामासाठीची एकूण तरतूद रु.७९१.८० लक्ष (रुपये सात कोटी एक्याण्णव लाख ऐंशी हजार फक्त) व अनुषंगिक खर्चासाठीची एकूण तरतूद रु.७१.६५ लक्ष (एकाहत्तर लाख पासष्ठ हजार फक्त) आहे. अंदाजित किंमतीचा गोषवारा सोबत जोडलेल्या विवरणपत्रात देण्यात आला आहे.

२) व्यय अग्रक्रम समितीच्या दि.९ एप्रिल २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील " जून २०१६ पर्यंत काम पूर्ण करण्याच्या अटीवर सदरचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा." या अटीच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यतेचा हा निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३) या योजनेच्या कामावरील खर्च मुख्य लेखाशिर्ष मागणी आय ५ "४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च-१९०, सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमा यांतील गुंतवणुका (१२)(०१)

मराठवाडा विभागासाठीचा भाग भांडवली अंशदान (४७०२ ७६२१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मंजूर अनुदानातुन भागविण्यांत यावा.

४) हा शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.६३/१५/व्यय १२ दि.११/०२/२०१५ अन्वये तसेच व्यय अग्रक्रम समीतीने दि. ९ एप्रिल २०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजूरीनुसार व संदर्भ क्रं २ नुसार याबाबतच्या निर्गमीत केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५) या योजनेस प्रदान केलेली सुधारित प्रशासकीय मान्यता अ.क्र.१००/२०१५ वर नोंदविण्यांत आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०३१२४७४३२१२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Baburao Kshirsagar

Digitally signed by Rajendra Baburao Kshirsagar
DN: CN = Rajendra Baburao Kshirsagar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Resources Department
Date: 2015.06.03 12:50:08 +05'30'

**(रा. बा. क्षीरसागर)**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१) अंदाजित किंमतीच्या गोषवाऱ्यासह :-
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर.
४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
५) मुख्य अभियंता(विप्र), जलसंपदा विभाग, पुणे.
६) आंतर वित्त सल्लागार व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) जिल्हाधिकारी सोलापूर, सोलापूर.
८) अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर.
९) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
१०) उपसचिव (लपा)/ अवरसचिव(लपा) /उपअभियंता(लपा-१), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कार्यासन अर्थ १-२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क, महासंचालक, मंत्रालय, मुंबई.

(शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. सुप्रमा १०१२/(३२४/२०१२) ल.पा.१, दि. ३० मे २०१५ चे सहपत्र)

## विवरण पत्र

लपात, चिखलगी,ता.मंगळवेढा, जि. सोलापूर अंदाजित किंमतीचा गोषवारा

| अ.क्र. | उपशिर्ष | किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | अ - प्राथमिक कामे | १.६३ |
| २ | ब - भू संपादन | ७५.२६ |
| ३ | सी - कामे | २५८.९४ |
| ४ | डी-रेग्युलेटर | १४.४१ |
| ५ | इ फॉल्स | ८.१५ |
| ६ | आरएचटी कामे | ९३.३८ |
| ७ | जी-ब्रीजेस | ५५.८१ |
| ८ | एच-एस्केप | २.६२ |
| ९ | के- इमारत | १३.११ |
| १० | एल-अर्थवर्क | ७६.०१ |
| ११ | एम-प्लॅटेशन | ५.१० |
| १२ | ओ संकीर्ण | ३.८७ |
| १३ | पी देखभाल | २.०० |
| १४ | क्यू- हत्यारे व सयंत्रे | ०.०० |
| १५ | आर दळणवळण | १६.५० |
| १६ | थर्ड- डिस्ट्रीब्युटरी | १६५.०० |
| १७ | अनुषंगिक खर्च | ७१.६५ |
| | **एकूण** | **८६३.४५** |

### ठळक वैशिष्टे

१. योजनेची सिंचन क्षमता - ११०० हेक्टर
२. नियोजित पाणी साठा - ८७४० स.घ.मी.
३. पाणी साठ्याची प्रती स.घ.मी किंमत - रु. ९८७९/-स.घ.मी.
४. लाभव्यय गुणोत्तर - १.९६